# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक:02.09.2026** **वार:बुधवार**

---

**ठळक बातम्या**

1. दहशतवादाला होणारा वित्तपुरवठा, कट्टरतावाद आणि दहशतवाद्यांची आश्रयस्थानं मोडीत काढण्याचं पंतप्रधानांचं शांघाय सहकार्य संघटनेला आवाहन.
2. 2029 पर्यंत राज्यातून अंमली पदार्थांचं समूळ उच्चाटन करण्यासाठी तयार करण्यात आलेलं सर्वसमावेशक धोरण राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर.
3. केंद्र सरकारकडून साखरेच्या घाऊक विक्रेत्यांसाठी साखरसाठ्याच्या मर्यादेत कपात.
4. 'नीट' पेपरफुटीबाबतच्या विद्यार्थी आंदोलनांसंदर्भातले सर्व एफआयआर रद्द करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश.
5. ऑगस्ट महिन्यात पावसाची ओढ, बीड, लातूर, बुलढाणा जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याची शेतकऱ्यांची मागणी.

**पंतप्रधान मोदी**

दहशतवादाच्या बाबतीत दुटप्पी धोरणाला कोणतंही स्थान असू शकत नाही, त्यामुळं दहशतवादाला होणारा वित्तपुरवठा,कट्टरतावाद आणि दहशतवाद्यांची आश्रयस्थानं मोडीत काढण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल बिश्केक इथं 26 व्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर  परिषदेत बोलत होते. या शिखर परिषदेनंतर, सदस्य देशांच्या नेत्यांनी 'बिश्केक जाहीरनाम्यावर' स्वाक्षरी केली.

या जाहीरनाम्यात भारताच्या प्राधान्यक्रमांना महत्त्वाचं स्थान मिळालं आहे. तसंच "एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य" या संकल्पनेचा जाहीरनाम्यात पुनरुच्चार करण्यात आला.

**पंतप्रधान**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या जीडीपी वाढीबाबत देशवासीयांचं अभिनंदन केलं आहे. आत्मनिर्भरतेवर भर देताना, परदेश दौरे आणि सोने खरेदी टाळण्याचं आवाहनही त्यांनी केलं आहे. समाजमाध्यमांवरील एका दृक-श्राव्य संदेशांत पंतप्रधान म्हणाले...

***देशवासियों को बहुत-बहुत बधाई। 7.8% ग्रोथ देश खुशियों से भर गया है। लेकिन देशवासियों को मैं बधाई देता हूं। उनके संकल्प शक्ति के लिए, उनके पुरुषार्थ के लिए एक सामूहिक शक्ति का प्रतिबिंब है। दुनिया युद्ध में डूबी हुई है। चारों तरफ युद्ध की खबरें आ रही हैं। 2020 में कोविड काल से लेकर अब तक कहीं पर भी स्थिरता नजर नहीं आ रही है। उसके बावजूद भी भारत तेज गति से प्रगती कर रहा है। हमें इस गति को बनाये रखना है। हमें बढ़ना भी है और इसके लिए आत्मनिर्भर भारत बनना बहुत जरूरी है। स्वदेशी का मंत्र 'वोकल फॉर लोकल-मेड इन इंडिया' के मंत्र को जीना चाहिए। हम जितना ज्यादा स्वदेशी पर बल देंगे, जितना आत्मनिर्भर पर बल देंगे। मुझे पक्का विश्वास है। जब आजादी के 100 साल होंगे। हम हमारी युवा पीढ़ी को विकसित भारत सुपूर्त करेंगे।***

उझबेकिस्तान आणि किर्गिझस्तानचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान काल मायदेशी परतले.

**मंत्रिमंडळ निर्णय**

2029 पर्यंत राज्यातून अंमली पदार्थांचं समूळ उच्चाटन करण्यासाठी तयार करण्यात आलेलं सर्वसमावेशक धोरण काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आलं. शासनाच्या सर्व विभागांच्या सहभागातून हे धोरण राबवण्यात येणार असून, ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत विविध विभागांना जबाबदाऱ्यांचं वाटप करण्यात आलं आहे. विविध विभागांच्या सहकार्याने अशाप्रकारे सर्वसमावेशक अभियान राबवणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य आहे.

आगामी शैक्षणिक वर्षापासून, शालेय शिक्षणात इयत्ता पाचवीपासून अंमली पदार्थांच्या जनजागृतीबाबत किमान एक धडा समाविष्ट करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या कामासाठी चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता कालच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. त्यानुसार या प्रकल्पासाठी 5 हजार 704 कोटी 50 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागातील सिंचन सुविधांना बळकटी मिळणार आहे.

सोलापूर शहरातल्या राष्ट्रीय महामार्गावरील जुना पुणे नाका ते बोरामणी नाक्यापर्यंतच्या चार पदरी उन्नत मार्गिकेला 'आवश्यक निकडीचा सार्वजनिक प्रकल्प' म्हणून घोषित करण्यास मंत्रिमंडळानं मान्यता दिली. या उन्नत मार्गामुळे सोलापूर शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत मिळणार आहे.

शासकीय, निमशासकीय बैठका आणि शासकीय कार्यक्रमांदरम्यान तसंच शासकीय उपाहारगृहात आरोग्यदायी अल्पोपहार आणि जेवण उपलब्ध करून देण्याचा निर्णय मंत्रीमंडळानं घेतला.

**साखरसाठा**

केंद्र सरकारनं साखरेच्या घाऊक विक्रेत्यांसाठी असलेल्या साखरेच्या साठ्याची मर्यादा 4000 क्विंटल्सवरुन 2000 क्विंटल इतकी कमी केली आहे. देशांतर्गत बाजारपेठेत पुरेशी साखर उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी तसंच साखरेची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी सरकारनं 15 सप्टेंबर ते 30 नोव्हेंबर या कालावधीसाठी हा निर्णय लागू केला आहे.

दरम्यान, केंद्रीय अन्न मंत्रालयाने सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यासाठी 13 लाख मेट्रिक टन साखरेचा कोटा खुला केला आहे. परिणामी, घाऊक बाजारातील साखरेच्या दरात प्रती क्विंटल सुमारे 500 रुपयांनी घट झाली.

**नीट पेपरफूटी-FIR**

'नीट' पेपरफुटीच्या मुद्द्यावरून जुलै महिन्यात झालेल्या विद्यार्थी आंदोलनांसंदर्भातले सर्व एफआयआर रद्द करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्याचबरोबर, या प्रकरणांचा पाठपुरावा किंवा तपास केला जाऊ नये असंही खंडपीठाने आदेशात नमूद केलं आहे. हा आदेश संपूर्ण देशासाठी लागू करण्यात आला आहे. याच कालावधीत झालेल्या आंदोलनाच्या घटनांबाबत कोणत्याही राज्याने किंवा केंद्रशासित प्रदेशाने नवीन एफआयआर दाखल करू नये, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

मात्र, जंतरमंतर येथील आंदोलनात उपस्थित असलेल्या 2,873 व्यक्तींची पार्श्वभूमी गंभीर गुन्हेगारी स्वरूपाची असल्यामुळे त्या एफआयआरचा तपास पुढे चालू ठेवण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली पोलिसांना दिली आहे.

न्यायालयाच्या या निकालाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतलं 5 सप्टेंबरचं नियोजित आंदोलन रद्द केल्याची घोषणा सीजेपीनं केली आहे.

**रेशीम शेती**

राज्यात 'सॉईल टू सिल्क आत्मनिर्भर रेशीम ग्राम' या संकल्पनेच्या माध्यमातून रेशीम शेतीची लागवड ते मूल्यवर्धित उत्पादन आणि बाजारपेठेपर्यंतची संपूर्ण मूल्यसाखळी गावपातळीवर उभारण्यात येणार असल्याची माहिती वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी दिली. या प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येणार आहे. यामुळे उत्पादन आणि उत्पादकता वाढण्यासोबतच गुणवत्तेत सुधारणा होईल आणि शेतकऱ्यांना बाजारपेठेशी थेट जोडणं शक्य होईल. प्रगत रेशीम

गावांना 'रोल मॉडेल रेशीम ग्राम' म्हणून विकसित करून त्यांची यशोगाथा राज्यातल्या इतर गावांपर्यंत पोहोचवण्यात येईल. यातून राज्यात रेशीम शेतीची नवी चळवळ उभी करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे अशी माहिती सावकारे यांनी दिली.

**महाभूमी स्टॅक**

राज्य शासनाच्या महसूल आणि वन विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या, भूमी प्रशासनासाठीच्या महाभूमी स्टॅक प्रणालीचा प्रारंभ काल मुंबईत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रणालीमुळे राज्यातील सर्व जमिनींच्या मालकी हक्काबाबतची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार असल्यानं राज्यातील गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

**गणेशोत्सव-विशेषरेल्वे**

गणेशोत्सवातली प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन, मध्य रेल्वेनं कोकणातील विविध स्थानकांसाठी मुंबई, पुणे आणि नागपूर इथून एकंदर 262 विशेष गाड्यांच्या फेऱ्या जाहीर केल्या आहेत. यामध्ये 200 आरक्षित आणि 62 अनारक्षित विशेष गाड्यांचा समावेश आहे.

**लेझरलाईट बंदी**

पुणे जिल्ह्यात सार्वजनिक गणेशोत्सवादरम्यान अर्थात 14 ते 25 सप्टेंबर या कालावधीत लेझर लाईटच्या वापराला मनाईचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जारी केले आहेत. या आदेशाचा भंग केलेला आढळून आल्यास, संबंधित व्यक्ती, संस्था तसंच मंडळांवर न्यायालयीन तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल असं या आदेशात म्हटलं आहे.

**ध्वनी प्रदूषण**

यंदाच्या गणेशोत्सवात पुण्यात ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी 'पुणे पॅटर्न' तयार करण्याचा निर्धार पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी व्यक्त केला आहे.

**ऑगस्ट पाऊस**

ऑगस्ट महिन्यात राज्यात पावसाचं प्रमाण सरासरीपेक्षा लक्षणीयरित्या कमी राहिलं आहे. शासनानं जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, कोकण विभागात सरासरीच्या 68 टक्के, पुणे विभागात 50 टक्के, नागपूरमध्ये 46 टक्के आणि नाशिकमध्ये 43 टक्के पाऊस नोंदवला गेला.

छत्रपती संभाजीनगर विभागात सरासरीच्या 29 टक्के, तर अमरावती विभागात 21 टक्के पाऊस झाला.

**पाऊस कमतरता**

बीड, लातूर आणि बुलडाणा जिल्ह्यात पावसानं ओढ दिल्यामुळे पिकांचं नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात कृत्रिम पावसाच्या प्रयोगाची मागणी शेतकरी हक्क मोर्चानं केली आहे.
तर लातूर जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा या मागणीसाठी शेतकरी संघटनेनं पिंपळफाटा इथं रास्ता रोको आंदोलन केलं.

बुलडाणा जिल्ह्यातही दुष्काळ जाहीर करुन तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना शिंदे गटानं केली आहे.

**हवामान**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार आज कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी, विदर्भात आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मेघ-गर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.